# आणि वेध पुण्यात...

– दीपक पळशीकर




२५ सप्टेंबर २०११, रविवार,...

...यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड, पुणे

...सकाळचे दहा वाजले, नाट्यगृहाचा पडदा वर गेला आणि मी स्टेजवरून लोकांना अभिवादन करत होतो....

सुस्वागतम्, सुस्वागतम, सुस्वागतम !

पुण्यातील पहिल्या वेध परिषदेत आपले स्वागत. पुढील काही तास आपण एका विचारसूत्राने बांधले जाणार आहोत आणि ते सूत्र आहे –

'सृजनशीलता आणि सर्जनशीलता'

आज गेल्या तीन वर्षांचा लेखाजोखा मांडताना माझ्या डोळ्यासमोरून पहिल्या वेधचे दृष्य हलतच नाही. या सर्वाची सुरुवात फारच अनोखी होती. एप्रिल २०११, वेध म्हणजे काय? याची पुसट कल्पनाही नव्हती. माझी बहीण डॉ. कल्पना जोशी हिचा मला फोन–

''दादा, डॉ. आनंद नाडकर्णी वेध प्रशिक्षण शिबिर घेणार आहेत. तू ये''.

मी माझ्या सहकारी मंजुषा बाराहाते आणि विदुला लिमये यांच्या समवेत ठाण्यात आय.पी.एच. मध्ये वेध कार्यशाळेसाठी दाखल झालो. दोन दिवसांच्या शिबिराच्या समारोपात तेथे आलेल्या सर्वांना सप्टेंबर मध्ये पुण्यात पहिल्या वेध परिषदेला येण्याचे निमंत्रण देऊन टाकले. या परिषदेचे विचारसूत्र सृजनशीलता आणि सर्जनशीलता हे ही तिथेच निश्चित केले आणि सुरू झाला वेध प्रवास–

असा प्रवास की जो सुरुच रहाणार आहे. अखंड सतत–

सुरु झाले, वेधचे इव्हेंटमॅनेजमेंट...

फॅकल्टी ठरविणे, नाट्यगृह मिळविणे, प्रवेशिका छापणे, निमंत्रितांना आमंत्रण असे पुष्कळ काही. अनुभव विश्व समृद्ध करणारे. त्या दिवसाने काय दिले–

एक नवीन दृष्टी. एक नवीन उर्मी. एक नवीन उर्जा! हे सर्व काही विलक्षण आहे. अनुभवल्या शिवाय न कळणारे आणि आकलन झाल्यावर त्यात झोकून देणारे क्षण. केवळ अद्भूत अविश्वसनीय, अविस्मरणीय!

'वेध'ने दिलेले समाधान पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या प्रतिसादातच आहे. पुढील दोन बोलकी पत्रच सर्व काही सांगणारी–

२५ सप्टेंबर २०११, रविवार

'वेध' या कार्यक्रमाचं मला गेले कित्येक वर्षे विलक्षण आकर्षण होतं. डॉ. आनंद नाडकर्णी हा कार्यक्रम घेतात, त्याला जावं अशी खूप मनापासून इच्छा होती.

मला सर्वप्रथम दातार क्लासेस आणि पळशीकर इन्स्टिट्यूटचे मनापासून आभार मानायचे आहेत. 'वेध' या कार्यक्रमाचे काल पुण्यात प्रथमच बीजारोपण झालं. खूप आनंद झाला. दिनांक २५ सप्टेंबरची सकाळ इतकी छान उगवली. अत्यंत दुर्दम्य अशा उत्साहात मी आणि माझी मुलगी ईश्वरी कार्यक्रमाला आलो आणि ते ६ तास अक्षरश: खिळवून ठेवणारे झाले. कार्यक्रमाचे नियोजन, मांडणी, वेळेचे Planning सर्वोत्तम होते. 'वेध' ने काल जे काही दिलं ना त्याचं वर्णन करायला खरोखर शब्द अपुरे पडतायत. आपण सगळेजण 'करिअर' वर खूप गप्पा मारत असतो. पण एखाद्या व्यक्तीचं करिअर होतं म्हणजे नक्की कोणत्या टप्प्यातून ती व्यक्ती जात असते; त्या व्यक्तीचा किती प्रकारे कस लागत असतो. एवढं करुनही परत ती व्यक्ती किती साधीच असते. अजून खूप काही करायचं आहे. अशी मनाची घाटणी असते त्या व्यक्तीची :

सर्जनशीलता, सृजनशीलता एखाद्या व्यक्तीमध्ये या दोन्ही गुणांचा परिपाक कसा होत जातो. Creativity ची Process कशी घडत जाते. याचे एकेक पदर अतिशय उत्तमपणे उलगडले गेले या परिषदेत. ते ऐकताना आम्ही भरून पावलो. या कोणत्याही व्यक्तींनी जमिनीवरचे पाय सोडलेले नाहीत. अत्यंत प्रामाणिकपणे, एकनिष्ठेने ते त्यांचं काम पार पाडत असतात; त्यांची जिद्द, चिकाटी, ध्यास, प्रामाणिकपणा, मूल्यांचा आदर इ. गुण जाता–जाता डॉ. आनंद नाडकर्णी यांचेमुळे समजत गेले. मला वाटतं प्रत्येक सेकंदाचा सकारात्मक उपयोग करणारी ही सगळी मंडळी होती.

सुचेताची विलक्षण कष्ट घेण्याची (आनंदाने) तयारी.

सलील–संदीपचं आगळं वेगळं tuning.

अभिजीत घोलप यांची संशोधनाची अभिव्यक्ती

चेतनचा प्रत्येक नवी गोष्ट शिकण्याचा ध्यास, धडपड, रेणुकाची सगळ्याच गोष्टींकडे बघण्याची सहजपणाची सवय डॉक्टरांनी या सगळ्यांना बांधून ठेवून विणलेला सुवर्णकमळांचा हार. सगळ्यांनाच शतश: प्रणाम, सलाम, खूप शुभेच्छा!!

डॉ. आनंद नाडकर्णी सहित सगळ्याच वक्त्यांना एका धाग्याने घट्ट बांधून ठेवलेलं होतं ते म्हणजे प्रेम. ही सगळी जणं अतिशय 'आंनदी' व्यक्तीमत्त्व आहेत हे सतत जाणवत होतं. त्यामुळे नाट्यगृहातलं वायूमंडल उर्जायुक्त झालं होतं. इतकी सगळी आनंदाची झाडं एका छताखाली अनुभवायला मिळणं हे खरोखर खूप भाग्याचं आहे.

प्रत्येक व्यक्ती अभूतपूर्व चैतन्यशक्तीने भरलेली वाटली. परत वेधचा कार्यक्रम १ वर्षांनी होणार याचं जरासं वाईट वाटतंय. पण ठीक आहे वर्ष भुर्रकन् उडून जाईल. तुम्हाला सर्वांनाच मनापासून भरपूर शुभेच्छा!!

– सौ. पूर्वा दिवाण



अभिजीत घोलप



चेतन देशमुख



सलिल आणि संदिप



सुचेता कडेठाणकर



रेणुका शहाणे



२५ सप्टें. २०११ वेळ दु. ३.२५

श्री. पळशीकर सर व सर्व सहकारी यांना
सस्नेह नमस्कार,

आपणा सर्वांच्या परिश्रम व आयोजनातून आम्हा सर्व पालक विद्यार्थ्यांना एक संस्मरणीय अनुभव मिळाला त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

अनेक सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांना शांतपणे समजून घेण्याचा अनुभव खूपच सुखद होता. त्याकरता त्यांना बोलतं करणाऱ्या डॉ. नाडकर्णींना ही धन्यवाद.

सध्याची मुले लाडावलेली आहेतच. त्यामुळे त्यांना अनेक गोष्टी सहजासहजी प्राप्त होतात. त्यामुळे सर्वच सोपे वाटणाऱ्या या पिढीतील मुलांसमोर या ‘वेध’ मधून ‘स्वप्न’ व ‘वास्तव’ यांचा पट फारच चांगल्या रीतीने उलगडला गेला असे मला वाटते. यशस्वी होण्यामागे किती कष्ट घ्यावे लागतात याची जाणीव ह्या मुलांना या कार्यक्रमातून होईल, ही अपेक्षा व खात्री.

आपल्या अतिशय सरळ व सोप्या कवितांमधून आयुष्य उगलडून दाखवणारे, ज्यांच्या हाती आजची पिढी पालकांनी संस्कारांसाठी निर्धाराने सोपवावी अशी सलील कुलकर्णी व संदीप खरे ही जोडी; आपल्यातल्या आत्मविश्वासाच्या बळावर मनुष्य अशक्य ते शक्य करून दाखवतो हे सिद्ध करणाऱ्या सुचेता कडेठाणकर, एकाग्रतेने एकाच वेळेस अनेक गोष्टी यशस्वीपणे करता येतात हे सांगणारे श्री. अभि घोलप, ॲनिमेशनच्या मोहमयी दुनियेच्या चुकीच्या आकर्षणाचे मुलांच्या डोळ्यावरील कातडे स्वत:च्या हुषारीने व जिद्दीने बाजूला करणारे वास्तववादी श्री. चेतन देशमुख व अभिनय क्षेत्राशी संबंधित धोकेही लक्षात आणून देणाऱ्या रेणुका शहाणे व या सर्वांचा जीवनपट आमच्या सर्वांना उलगडून दाखवणारे डॉ. नाडकर्णी या सर्वांचेही आभार.

पुढच्या ‘वेध’ परिषदेकरिता खूप खूप सदिच्छा!
आपली नम्र,

**– सौ. चिटणीस**

२५ सप्टेंबर २०११ रविवार,

दिवस कसा संपत आला समजतच नव्हते. रविवारच्या संध्या छाया पसरत होत्या. आणि मी पुन्हा स्टेजवर सांगत होतो–

भेटू पुढील वर्षी याच वेळी
याच सभागृहात
आणि पुढील वर्षीचे विचार सूत्र आहे–
Career in Research...
सफर संशोधनाची....

संशोधन क्षेत्राची वाट अभूतपूर्वच आहे. किती ज्येष्ठ, श्रेष्ठ संशोधकांची नावे झपाट्याने डोळ्यापुढे आली. पण आम्ही ठरविले तरुण, अप्रसिद्ध पण ज्ञानलोलुप विज्ञान साधकांना बोलवायाचे. या सत्रातील सर्वच फॅकल्टी २५ ते ३० वयोगटातील होते. मनात एक धाकधूक चाललेली... फॅकल्टी पैकी कोणीच सेलिब्रेटी नाहीत, विषय सुद्धा अवघड, पण प्रत्यक्ष झाले वेगळे.. सर्व विज्ञान साधकांची सत्रे एकदम हिट! स्टेम सेल वर काम करणारा डॉ. तेजस गुप्ते, जर्मनीमध्ये मरिन इकॉलॉजी, पीटलँड केमेस्ट्रीवर काम करणारा रोहन शेट्टी यांच्या भोवती तर विद्यार्थ्यांचा गराडाच पडला. विद्यार्थ्यांनी त्यांना काय काय प्रश्न विचारले हे तेच जाणो. रोहन शेट्टी तर एकदम 'सेलिब्रेटी' स्टेटसला पोहोचला आणि नंतर नाशिक, औरंगाबाद येथील वेधची सत्रही त्याने गाजवली. या अनुभवातून एक शिकलो. 'सेलिब्रेटी' हवेतच असे नाही. विद्यार्थ्यांच्या अनुभवकक्षा संपन्न करणारी व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांना भावतात. नव्हे अशा व्यक्तिमत्त्वांना विद्यार्थी डोक्यावर घेतात. या अनुभवातून आणखी एक समजले, ''आजचा विद्यार्थी समंजस आहे, तो विचार करतो त्याला योग्य आणि अयोग्य याची जाण आहे. सर्वच विद्यार्थी दिखाऊपणाला भाळतात असे नाही. जे जे उत्तम आहे ते ते घेण्याचा प्रयत्न आजचा तरुण करतो आहे. किती आश्वासक भावना! ही भावना प्राप्त झाली या 'वेध' मधून.

संशोधनाच्या सफरीवरून बाहेर पडलो आणि २०१३ चे सूत्र तयार झाले – Follow the Dream– स्वप्नाच्या वाटेवर...

डॉक्टर आनंद नाडकर्णींनी शब्दबद्ध केले वेध गीत–

**एक सपना, मेरे मनमें**
**नन्हासा, छा जाता...**
**साँस मेरी उस सपनेमें**
**ऐसे घुल मिल जाती...**
**मेरा जीना, मेरा सपना**
**एकही ही जाता...**
**उसके बिना, ये जीना**
**कैसे बीत जाता... कैसे बीत जाता**

'वेध' मध्ये दरवर्षी काही नवीन बदल करावयाचा या मनोभूमिकेतून हे वेध गीत ऑडिओ–व्हिज्यूअल स्वरुपात सादर केले. या गीतासाठी वापरलेली सर्व 'व्हिज्युअल्स' या वेध मध्ये आमंत्रित केलेल्या फॅकल्टींच्या कर्तृत्वाची गाथा सादर करणारी होती. हे वेध गीत एकदम सूपर–डूपर हिट झाले. या गीताचा आनंद आजही तुम्ही यू–ट्यूबवर घेऊ शकता.


तेजस गुप्ते


प्रियदर्शिनी कर्वे

पुण्यातील हा तिसरा वेध होता. यातही कोणीही सेलिब्रेटी नव्हते. सागर परिक्रमा करणारे पहिले भारतीय कमांडर दिलीप दोंदे. एकट्याने non stop सागर परिक्रमापूर्ण करणारे ले. कमांडर अभिलाष टॉमी (यांना गतवर्षी पद्मश्रीने गौरविण्यात आले) उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव या दोन्ही ध्रुवांवर (वयाच्या २३व्या वर्षी) फ्री फॉल करणारी जगातील पहिली महिला पद्मश्री शीतल महाजन, भारताची एकमेव महिला सेलर व डॉक्टरकीचा (MBBS) अभ्यास करणारी रोहिणी राऊ, आणि ब्लॅक इज् ब्यूटीफूल' म्हणत जगाला नवचैतन्य देणारी, नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकन झालेली दृष्टीहीन सुसान सॅब्रीअे टेनबर्कन! कोणत्याही सेलिब्रेटीपेक्षा अधिक सेलिब्रेटी ठरली. यांनी एक वेगळा जीवनसंदेश दिला. जगण्याची नवी उमेद दिली. स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचे सामर्थ्य दिले. सॅब्रीअेला मिळालेले स्टँडिंग ओव्हेशन, सतत पाच मिनिटे होत असलेला टाळ्यांचा गजर... या आठवणींनी माझ्या डोळ्यांच्या कडा आजही ओलावतात. एका विलक्षण भावनेने मन चिंब भिजते. ही भावना शब्दातीत आहे.

वेध ने आम्हास काय दिले?

एक टीम उभी करण्याचे सामर्थ्य दिले. उत्तमांचा शोध घेण्याची उर्मी दिली. विद्यार्थ्यांसाठी काम करण्याची ऊर्जा दिली. समाजमनाच्या स्पदनांना साद घालण्याची उमेद दिली. विद्यार्थ्यांच्या पुढे सामान्यातील असामान्यत्व दृग्गोचरित करण्याचे बळ दिले. विद्यार्थी, पालक आणि आम्हा सर्वांना नव विचारांची प्रेरणा दिली. कुठल्याही अभिनिवेशापलिकडे जीवनमूल्य, जीवनादर्श रुजविण्याचे समाधान दिले.

'वेध' माझ्यासाठी आता जीवन साधना झाले आहे.

"A Mission for life"...


**– दीपक पळशीकर**

आयोजक, वेध पुणे

dpalshikar@yahoo.co.in

9552551321




अशोक खुटवड



रोहन शेट्टी



राजदीप चॅटर्जी